# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**3 JULY, 2018**

[Time : 14-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - I**

**(Time Allowed : 1 Hour)**

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - १**

(वेळ : १ तास)

---

**प्र.1)** पुढील पत्र आकर्षक पद्धतीने टंकलिखित करा : **[गुण : ३०]**

**अजय-विजय इलेक्ट्रॉनिक्स कंपनी,**

२८६, बजाजनगर, लोकमान्य टिळक मार्ग,

चंचलनगर, चिंचवड, पुणे-१७

जावक क्रमांक : चौकशी/८१७-२० दिनांक : आजचा टाका

प्रति,
मा. प्राचार्य,
टिळक आयुर्वेदिक महाविद्यालय,
रास्ता पेठ, पुणे

विषय : आपल्या महाविद्यालयाकरिता मालाचा पुरवठा करण्याबाबत...

संदर्भ : आपले चौकशी पत्र...

महोदय,

आपले मागील संदर्भांकित चौकशी पत्र मिळाले पुण्यातील नामांकित महाविद्यालयाने आमच्याकडे स्वतःहून मालाची चौकशी केल्याने आमच्या नव्याने सुरु झालेल्या लघुउद्योगास उत्तेजन मिळाले आहे.

आमच्या कंपनीने नुकतीच कारभारास सुरुवात केली आहे. त्यामुळे आमची उत्पादनक्षमता कमी आहे. मात्र आपण संधी दिल्यास आम्ही आपणांस निराश करणार नाही. आपल्या सर्व ऑर्डर्स वेळेत पूर्ण होतील

याची आम्ही खात्री देऊ शकतो. शिवाय सुरुवातीचा काळ असल्याने आम्ही आपणांस कमी किंमतीत व विशेष सवलतीत माल उपलब्ध करून देऊ.

आम्ही उत्पादित करीत असलेल्या वस्तूंची यादी व ग्राहकांकरिता असलेल्या मूल्य सूची आपणांकडे पाठवीत आहोत. संधी मिळेल ही अपेक्षा.

कळावे,

आपला विश्वासू,

प्रोप्रायटर,
अजय-विजय इलेक्ट्रॉनिक्स कंपनी

सोबत : आवश्यक काही कागदपत्रे

**प्र.2)** पुढील रकाना टंकलिखित करा. रकान्याच्या ओळी टंकलेखन यंत्रावर अथवा शाईने आखा. दर्शकबिंदू आवश्यक आहेत. **[गुण : ३०]**

**विविध जिल्ह्यातील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या दर्शविणारा तक्ता**

(वर्ष २०१२-१३)

| अनु. क्रमांक | जिल्हे | एम.ए. | एम.कॉम. | एम.एससी. |
|---|---|---|---|---|
| १. | ठाणे .. | ९१६ | ९१५ | ७,१९२ |
| २. | सातारा .. | ६,०१६ | ३,०१७ | ५,१९२ |
| ३. | सोलापूर .. | ३,०२६ | ७,१०२ | ३,०१६ |
| ४. | कोल्हापूर .. | ८,०१६ | ७,१४२ | ७,१६२ |
| ५. | अमरावती .. | २,०१६ | ३,०१६ | ५६१ |
| ६. | नाशिक .. | २९१ | १०२ | २०३ |
| ७. | नागपूर .. | २,०१६ | ४,०२७ | ८,२८१ |
| ८. | पुणे .. | ६,७१५ | ७,३७२ | ९,६१५ |